## ग्रीनलॉन्स विदयालय

**इयत्ता – ९ वी-अ,ब,क.** **FINAL EXAMINATION** **मार्क – ८0**

**दिनांक : ११ /०२/२०२५** **विषय – मराठी** **वेळ-2 &1/2 तास**

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.**

**2. Section 'A' and section 'B' answers must be written on the answer**

**Sheet itself.**

---

**SECTION 'A' ( MARKS- 40 )**

**प्रश्न १. खालील दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

सुमारे दोनशे पासष्ट चौरस किलोमीटर विस्तार असलेली काझीरंगा पशुस्थळी अथवा अभयारण्य साऱ्या भारताचे एक भूषण आहे. एक आफ्रिका सोडल्यास इतके विविध आणि असंख्य पशुपक्षी आसामशिवाय जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेच आढळत नाहीत. इतकेच नव्हे, तर आसाममध्ये वावरणारे काही काही प्राणी जगाच्या पाठीवर दुसरीकडे कुठेही आढळत नाहीत. हुलॉक नावाचा एक पुच्छविहीन वानर फक्त आसामातच आढळतो. भारताच्या इतर कुठल्याही प्रांतात त्याची वस्ती नाही. त्याचे हुलॉक हे नावसुद्धा त्याच्या आवाजावरून पडले आहे.

आसामचे वैशिष्ट्य दाखवणारा दुसरा प्राणी म्हणजे एकशिंगी गेडा. एखाद्याचा पुतळा पाहणे आणि त्याला प्रत्यक्ष पाहणे यात फार फरक असतो. मी तर गेंडा व त्याच्याबरोबर आसामातले इतर पशुपक्षीही प्रत्यक्ष व जवळून पाहण्याची सधी मिळावी म्हणून काझीरंगाला आलो होतो. अशा ठिकाणी वन्य पशू बहुधा सकाळी लवकर अथवा सूर्यास्ताच्या वेळी पाहायला मिळतात.

काझीरगाची भूमी ही कर्दमभूमी आहे. इथल्या कमरेइतक्या चिखलातून फिरणे माणसाला अशक्यच. शिवाय इथे सर्वत्र उंच गवत वाढलेले असते, की त्यात हत्तीवर बसलेला माणूसही लपून जातो .

प्रवाशांना या जंगलात फिरवून आणण्यासाठी आसाम सरकारने पंधरा-वीस हत्ती खास शिकवून तयार ठेवलेले आहेत. हे हत्ती वन्य पशूना घाबरत नाहीत व दाट गवतातूनही ते मार्ग काढू शकतात. जगातील प्रचंडकाय प्राण्यात भारतातील एकशिंगी गेंडाचा चौथा नंबर लागतो असे म्हणतात . पहिल्या तिघांत आफ्रिकी हत्ती, भारतीय हत्ती व आफ्रिकेतला सफेद गेंडा यांचा समावेश होतो.

जंगलात फिरण्यासाठी मला एक हत्तीण मिळाली होती तिचे नाव वैजयती असे होते. मोठी देखणी, इंद्राच्या ऐरावताची मुलगी शोभेल अशी होती ती आणि चालत पण होती अशी ऐटीत, की गवतातून चालताना जणू रेशमी साडी सळसळते आहे असे वाटते. त्या माहुताकडून दोन गोष्टींची माहिती मिळाली बाजारात गेंड्याच्या नाकावरील शिंगाची किंमत जवळजवळ दोन हजार रुपये इतकी असते ही एक व दुसरी अशी, की शरीर थंड राखण्यासाठी चिखलाने अग माखून घेणारा गेंडा हा सामाजिक आरोग्याचा भोक्ता आहे. सबंध मोठ्या जगलात फक्त एकाच ठिकाणी जाऊन तो आपली विष्ठा टाकतो कित्येक मैल दूर असला तरी त्याच एका जागेवर तो नेहमी परतून येतो. घाण वाटेल तेथे टाकू नये, शेजाऱ्या-पाजाऱ्यास त्रास होईल असे वागू नये हे समजणारा गेंडा निःसंशय शहाणाच म्हटला पाहिजे.

काझीरगाचा विस्तीर्ण वनप्रदेश तुडवत आणि भिजलेल्या वाऱ्यावर मंद मंद गतीने तरंगत गिरक्या घेणारा जमिनीचा व गवताचा वास हुंगत वैजयंती प्रवासी बंग्ल्याच्या दिशेने चालू लागली का कोण जाणे; पण वाटेत पुन्हा ती थबकली आणि त्याच वेळी समोरून हरणाचा एक कळप उड्या मारत पळत पळत निघून गेला त्या हरणाकडे पाहून एका विलक्षण समाधानाने माझे मन भरून आले. त्याचा तो कळप सारंगाचा आहे असे मनाला वाटू लागले किंचित काळसर अंगावर अस्पष्ट पांढुरके ठिपके असलेल्या हरणांना सस्कृत भाषेत सारंग म्हणतात . या हरणांचा कळप वेगाने जातो, त्या वेळी एखादा काळा-पांढरा

ढग वाऱ्यावर  तरंगतो  आहे असे वाटते .ढगालाही संस्कृत भाषेत सारंग  हे नाव आहे.

**कृती १ : खालील प्रश्नांची  एका वाक्यात उत्तरे लिहा:**

**गुण ६**

१.  आसाममध्ये आढळणारा पुच्छविहीन नावाचा प्राणी कोणता आहे ?

२.  जंगलात फिरण्यासाठी लेखकाला मिळालेल्या हत्तीणीचे नाव काय होते ?

३.  ढगालाही संस्कृत भाषेत काय म्हणतात ?

४.  प्रवाशांना  जंगलात फिरवून आणण्यासाठी आसाम सरकारने किती  हत्तींना खास शिकवून तयार ठेवलेले आहेत ?

५. आसामचे वैशिष्ट्य दाखवणारा दुसरा  कोणता प्राणी आहे ?

६.  काझीरंगा अभयारण्य  किती  चौरस  किलोमीटर विस्तार असलेली  भूमी आहे ?

**कृती २. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा :**

**गुण ४.**

१.  वैजयंती या हत्तीणीची माहिती लिहा ?

२.  एकशिंगी गेंड्याविषयी माहिती लिहा ?

**कृती ३. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :**

**गुण  २**

१. किंचित काळसर अंगावर अस्पष्ट ------------------------------- ठिपके असलेल्या हरणांना सस्कृत भाषेत सारंग म्हणतात .

२. काझीरगाची भूमी ही ------------------------------------------------ आहे.

३. अशा ठिकाणी वन्य पशू बहुधा सकाळी लवकर अथवा ------------------------------------ वेळी पाहायला मिळतात.

४. जगातील --------------------------------------------- प्राण्यात भारतातील एकशिंगी गेंडाचा चौथा नंबर लागतो असे म्हणतात.

**प्रश्न २.(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात लिहा :**

**गुण ७**

१. लेखक शंकरराव खरात यांना चौथीच्या वर्गात गणित कोणी शिकविले ?

२. व्हेनिस या शहरात असलेल्या कालव्याचे नाव काय आहे ?

३. संस्कारमयदृष्ट्या लेखकाला कोणकोणत्या शिक्षकांनी उपकृत केले ?

४. लेखकाने व्हेनिस या शहरात प्रवासी बोटीचे तिकीट किती लिरांचे घेतले होते ?

५. व्यायामाचे महत्व या कवितेचे कवी कोण आहेत ?

६. कोणत्या खेळातसुद्धा जातपात मानली जात असे ?

७. ग्रँड कॅनॉल कसा आहे ?

**प्रश्न २.( ब) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण ५ .**

१. कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव -------------------------- शहर आहे. ( विलक्षण , अदभूत , आकर्षण )

२. खेळात मैदानात जात न पाहता ---------------------------------- पाहावे. ( कौशल्य , क्षमता , सशक्त )

३. व्हेनिस म्हणजे अफाट -------------------------------------- ! ( पाणीदर्शन , हवादर्शन , जलदर्शन )

४. नाईक मला चौथीत इंग्रजी आणि ------------------------------ शिकवत. ( इतिहास , भूगोल , नागरिकशास्त्र )

५. हेडमास्तर श्री. नाईक मास्तर यांचा शाळेत ---------------------------------- असे.

**प्रश्न २. (क) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :**

**गुण २**

१. आरोग्य देणारी : ---------------------------------------------

२. विरोध करण्याची क्षमता असलेली शक्ती : --------------------------------

३. स्वतःची कामे स्वतः करणारा : - -------------------------------------------

४ . एका अंगाने केलेला विचार : - ---------------------------------------------

**प्रश्न ३. (अ) खालील दिलेल्या वाक्प्रचारांचे अर्थ लिहा :**
**गुण ४**

१. उपकृत करणे  २. समुपदेशन करणे  ३. दरारा असणे
४. माघारी जाणे

**प्रश्न ३. (ब) खालील दिलेल्या शब्दंचे अर्थ लिहा :**
**गुण ४**

**( वेगळे , बलवान , आजार , भरपूर , अलंकार , कुशलता , मजबूत , प्रदेश )**

१. चिकार  २. कौशल्य  ३. सशक्त  ४.प्रांत  ५. विकार
६. भूषण  ७. कणखर  ८. अलिप्त

**प्रश्न ४. (अ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा : ( true or false)**
**गुण २.**

१. व्यायाम सर्वांकरता उपयोगी असतो -

२. व्यायामाने जडत्व वाढते -

**प्रश्न ४. (ब) खालील दिलेल्या शब्दांपासून वाक्ये तयार करा : (make meaningful sentences )** **गुण ४**

१. प्रसन्न (delightful) २. परिचय (introduction) ३. सल्ला (advice) ४. पाणरस्ते (waterways)

**SECTION 'B' ( MARKS- 40 )**

**प्रश्न ५. (अ) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दाचे समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा** **गुण ४**

१. अमयचे खेळात <u>नशीब</u> चांगले आहे.

२. आमच्या आजोबाकडे खूप <u>संपदा</u> आहे.

३. परीक्षेसाठी <u>केवळ</u> पाच दिवस शिल्लक आहेत.

४. जंगलात आम्ही <u>साप</u> बघितला.

**प्रश्न ५. (ब) विरुद्धार्थी शब्द लिहा :**

**गुण ४**

**( बेशिस्त , स्वस्त , स्वस्थ , रडणे , अवर्णनीय , निरक्षर , निराक्षर , अवर्नानिय, प्रतिकर्षण , सोपे , मुद्दाम )**

१. साक्षर २. वर्णनीय ३. शिस्त ४. महाग ५. आकर्षण
६. सहज ७. अवघड ८. हसणे

**प्रश्न ५.(क) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा** **गुण ४**

१. ग्रंथालयात एक <u>पुस्तक</u> आहे.

२. रेल्वे गाडीत मला अनेक <u>माणसे</u> दिसली.

३. माझ्या मित्राकडे एक <u>कर्णफुल</u> आहे.

४. माझ्या आजीच्या चेहेऱ्यावर मला एक <u>सुरकुती</u> दिसली.

**प्रश्न ६. ( अ) खालील वाक्यातील नामे व प्रकार ओळखा :**

**गुण २.**

१. रमेश हा एक आनंदी मुलगा आहे.

२. शाळेत मुले खेळ खेळतात .

**प्रश्न ६.(ब) खालील वाक्यातील विशेषणे ओळखून प्रकार लिहा :**

**गुण २**

१. वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे.

२. आई , मला शंभर रुपये देते का ?

**प्रश्न ६. (क) खालील वाक्यातील काळ ओळखा :**

**गुण २**

१. श्याम हा प्रामाणिक मुलगा आहे.

२. मी उद्या अभ्यास करणार .

**प्रश्न६.(ड) खालील वाक्यांचे प्रकार ओळखा :**

**गुण २**

१. मौन ही शब्दभाषेची खरी भाषा आहे !

२. मित्र कोणाला म्हणायचे ?

**प्रश्न ७ . खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा: ( ANY 1 )**

**गुण ५**

१. तुमच्या शाळेच्या ( in your school) क्रीडा विभागासाठी( sports section) खेळ साहित्याची ( sports equipmens) मागणी करणारे पत्र विध्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. व्यवस्थापक, कुशल स्पोर्ट्स केंद्र काळबादेवी, मुंबई - ४०० ००२ यांना लिहा.

Or

२. तुमच्या मित्राला/मैत्रिणीला (to your friend ) शाळेत गायन स्पर्धेत (school singing competition) प्रथम पुरस्कार (first prize) मिळाल्यामुळे त्याचे/तिचे अभिनंदन करणारे ( congratulation letter) पत्र लिहा.

**प्रश्न ८ . खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा: ( ANY 1 )**
**गुण ७**

**१. व्यायामाचे महत्व : -**

**मुद्दे : - आपले नियमित जीवन धावपळीचे - व्यायाम जीवनात खूप महत्वाचा - व्यायामाने शरीर तंदुरुस्त - शरीर चांगले राहते - व्यायाम आवश्यक आहे.**

**२. आपली समस्या - प्रदूषण : -**

**मुद्दे : मानव खूप हुशार - देवाने सुंदर निसर्ग देणे - मानवाने खराब करणे जल प्रदूषण - वायू प्रदूषण - ध्वनी प्रदूषण - प्रदूषण ही एक मोठी समस्या - उपाय .**

**३. मला पंख असते तर ------------**

**मुद्दे - रविवार सुट्टीचा दिवस - शाळेची घाई नसणे - शांत विचारात बसणे - मनात विचार येणे - जर मला पंख असते तर - मजाच मजा संपूर्ण जगात फिरायला मिळणे - आंनदच आनंद .**

**प्रश्न ९ . खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

बंधुप्रेम

प्रभू श्रीरामांनी आपले पिता दशरथ यांच्या आज्ञेनुसार वनवासाकडे प्रस्थान केले. जेव्हा प्रभु श्रीराम, लक्ष्मण व सीतामाई वनवासाला गेले तेव्हा त्यांचे लहान बंधू भरत व शत्रुघ्न अयोध्येत नव्हते. ते आपल्या आजोळी नंदीग्रामी गेलेले होते. प्रभु श्रीरामांच्या वनवास प्रस्थानाचे दुःख सहन न झाल्यामुळे पिता दशरथ यांनी आपले प्राण सोडले तेव्हा भरत आणि शत्रुघ्न

यांना आणण्यासाठी दूत पाठवला गेला. अयोध्येस परत येताच भरतास सर्व हकीकत समजली आपल्याला राजसिंहासन मिळावे म्हणून आपली माता कैकेयी हीनेच बंधू श्रीरामाना चौदा वर्षांच्या वनवासात पाठवले.

त्यावेळी क्षणाचाही विलंब न लावता भरत श्रीराम, लक्ष्मण व सीतामाई यांना परत आणण्यासाठी वनाकडे निघाला. यावेळी श्रीराम, लक्ष्मण व सीता चित्रकूट पर्वतावर होते. वनवासी वेशातील आपल्या ज्येष्ठ बंधूंना पाहताच भरतास गहिवरुन आले. त्याने धावतच जाऊन श्रीरामांच्या पायावर डोके ठेवले. श्रीरामानी त्यास उठवून आपल्या हृदयाजवळ घेतले.

भरत म्हणाला, “हे बंधो! माझ्या मातेने जे कृत्य केले त्याबद्दल मी आपली माफी मागतो.” आपण पुन्हा अयोध्येस चलावे आणि आपले राजसिंहासन सांभाळावे आपले स्थान इतर कोणीही घेऊ शकत नाही. मी तर केवळ एक सेवक आहे सर्व अयोध्यावासियांची देखील हीच इच्छा आहे. असे म्हणून त्यांना वारंवार परत चलण्याची विनवणी करु लागला.

तेव्हा प्रभू श्रीराम त्यास म्हणाले, हे अनुज! मी आपल्या पित्याला चौदा वर्षे वनवास पूर्ण करण्याचे वचन दिले आहे. ते वचन मी असे तोडू शकत नाही याकरिता चौदा वर्षे पूर्ण झाल्यावरच मी अयोध्येला परत येईन तोपर्यंत तूच हे राज्य सांभाळावे शेवटी भरतास प्रभू श्रीरामाचे म्हणणे ऐकावे लागले. यावेळी भरत प्रभू श्रीरामांना म्हणाले, "आपली आज्ञा असेल तर मी राज्य सांभाळीन परंतु सिंहासनाचे खरे अधिकारी तर आपणच आहात. त्यामुळे मला आपल्या चरणपादुका द्या. मी त्या सिंहासनावर ठेवून आपल्या राज्याची सेवा करीन परंतु चौदा वर्ष पूर्ण होताच आपणास लगेच अयोध्येत परत यावे लागेल. अन्यथा मी प्राणत्याग करीन.

याप्रमाणे भरताने देखील आपले वचन निभावले. चौदा वर्षे प्रभुरामांच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्याने अयोध्येचा राज्यकारभार केला. राजमहालात असूनही स्वतः वनवाश्याचे जीवन जगला व श्रीराम वनवासातून परत येताच त्यांना त्यांचे राज्य परत करुन टाकले.

धन्य ते प्रभू श्रीराम, धन्य तो भरत आणि धन्य त्यांचे 'आदर्श बधूप्रेम'

**कृती १ . पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (Answer in one sentence) गुण ५**

१. प्रभू श्रीरामांनी कोणाच्या आज्ञेनुसार वनवासाकडे प्रस्थान केले?

२. श्रीराम वनवासात गेले तेव्हा भरत व शत्रुघ्न कोठे गेले होते?

३. प्रभू श्रीरामांबरोबर वनवासात कोण कोण गेले?

४. भरताच्या आईचे नाव काय होते?

५. भरताने सिंहासनावर ठेवण्यासाठी प्रभू रामचंद्रांकडे काय मागितले?

**कृती २. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :**

**गुण २**

१. याप्रमाणे भरताने देखील आपले ------------------------------------ निभावले.

२. धन्य ते प्रभू श्रीराम, धन्य तो भरत आणि धन्य त्यांचे ---------------------------------------- .

३. ------------------------------------ वेशातील आपल्या ज्येष्ठ बंधूंना पाहताच भरतास गहिवरुन आले.

४. श्रीरामानी त्यास उठवून आपल्या ---------------------------------------- घेतले.

**कृती ३. खालील विधान कोणी कोणास म्हटले ते लिहा :**

**गुण १**

१. "हे बंधो! माझ्या मातेने जे कृत्य केले त्याबद्दल मी आपली माफी मागतो."